**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
पत्ता – १२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
कार्यालय संपर्क कमांक – ☎ (०२५६४) २३०००९
इमेल आयडी – dyspacbnandurbar@gmail.com

ला.प्र.वि.कार्यालय,नंदुरबार
कॅम्प शासकीय विश्रामगृह नवापुर,
दिनांक १७/०१/२०२३.

## :–प्रेस नोट :–

आलोसे श्री. नंदलाल शांताराम शिनकर वय–४७,व्यवसाय नोकरी – मुख्याध्यापक,(वर्ग ३) माध्यमिक विदयालय, सुळी ता.नवापुर जि.नंदुरबार रा.५२, साईनगरी, मेन रोड,नवापुर ता.नवापुर जि.नंदुरबार यांना १६००/–रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना पंचासमक्ष रंगेहात पकडले बाबत...

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद कमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | आलोसे श्री. नंदलाल शांताराम शिनकर वय–४७,व्यवसाय नोकरी – मुख्याध्यापक, (वर्ग ३) माध्यमिक विदयालय, सुळी ता.नवापुर जि.नंदुरबार रा.५२, साईनगरी, मेन रोड,नवापुर ता.नवापुर जि.नंदुरबार |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १६००/– रुपये (सोळाशे रुपये) |
| तडजोडीअंती मागणी केलेली लाचेची रक्कम | १६००/– रुपये (सोळाशे रुपये) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी सन २०१७–२०१८ यावर्षी माध्यमिक विदयालय सुळी, तालुका नवापुर येथे इयत्ता दहावीचे शिक्षण घेतले आहे. तकारदार हे त्यांचा शाळा सोडल्याचा दाखला व मार्कशीट घेणेकामी माध्यमिक विदयालय, सुळी येथे गेले असता, वर नमुद आलोसे मुख्याध्यापक यांनी तकारदाररकडुन दिनांक १४/०१/२०२३ रोजी पाच हजार रुपये घेऊन तकारदार यांना शाळा सोडल्याचा दाखला दिला. तकारदार यांच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर त्यांच्या आईचे नाव चुकीचे असल्याने, चुकीचे नाव दुरुस्त करुन घेण्यासाठी व त्याचे दहावीचे मार्कशीट घेणेकामी तकारदार यांनी आलोसे यांना पुन्हा विनंती केली. यावेळी आलोसे मुख्याध्यापक यांनी तकारदाराकडुन शाळा सोडल्याच्या दाखल्यावरील आईचे नाव दुरुस्त करुन देणे व नाशिक येथील बोर्ड कार्यालयातुन त्याचे मार्कलिस्ट आणुन देण्याच्या मोबदल्यात २०००/– रु लाचेची मागणी केली. त्यानंतर आज दिनांक १७/०१/२०२३ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान आलोसे मुख्याध्यापक यांनी तकारदारकडुन १६००/– रु. ची मागणी केल्याचे पंच साक्षीदारांसमक्ष निष्पन्न झाल्याने, नमुद आलोसे मुख्याध्यापक यांना तकारदाराकडुन पंच साक्षीदारांसमक्ष १६००/– रुपये लाच स्वीकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. सापळा कारवाई बाबत नवापुर पोलीस स्टेशन जिल्हा नंदुरबार येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई चालु आहे. |
| कामगिरी पथक | सदर' कामगिरी पोलीस उपअधीक्षक श्री.राकेश आनंदराव चौधरी, पोलीस निरीक्षक श्री. समाधान महादु वाघ, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/देवराम गावीत, करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

Scanned with CamScanner

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९

(राकेश आ.चौधरी) १८/०९/२३
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner